# आस्वाद

१९६१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. १५२८



REFBK-0011971
REFBK-0011971

राजा यावलीकर

# आस्वाद ...

काव्य-संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:

## राजा यावलीकर

[ श्री. ग. के. जोशी ]

प्रस्तावना : मंगेश पाडगांवकर

REFBK-0011971
REFBK-0011971

जगताप-कारले प्रकाशन

● प्रकाशक :

**स. आ. जगताप**
जगताप-कारले प्रकाशन,
१९२ शुक्रवार, पुणें २.

● चित्रकार :

**प्रताप मुळीक**
स्टुडिओ ज्युपिटर.

● मूल्य दोन रुपये :

● मुद्रक :

**मा. र. कारले**
जनसेवा मुद्रणालय,
१९२ शुक्रवार, पुणें २.

श्रीमान् भाऊसाहेब झाडबुके, एल्‌एल्. बी.
मॅनेजिंग एजंट, जयशंकर मिल, बार्शी
यांच्या सुविद्य पत्नी आणि
बार्शी नगरपालिका स्कूलबोर्डाच्या चेअरमन

सौ. प्रभावतीबाई झाडबुके बी. ए. (ऑनर्स)

यांना प्रेमादरपूर्वक अर्पण.

—राजा यावलीकर

• • •

# थोडेंसें आधीं—

माझ्या कवितांचा हा पहिलावहिला संग्रह. फार दिवस मनाशीं बाळगलेलें स्वप्न आज साकार होत आहे. या कामीं श्री. भाऊसाहेब झाडबुके, श्री. उ. ज. माळी यांचें हार्दिक सहकार्य व प्रोत्साहन लाभलें म्हणूनच हा संग्रह नांवारूपाला येऊं शकला.

प्रथितयश कवि श्री. मंगेश पाडगांवकर यांनीं आपुलकीनें रसग्रहणात्मक प्रस्तावना लिहून मला उपकृत केलें आहे. प्रस्तावना लिहून घेऊन आज तीन वर्षें झालीं, परंतु काव्यसंग्रहाचें काम मात्र कांहीं अपरिहार्य कारणामुळें रेंगाळत राहिलें. या अवधींतील कांहीं कविता यांत समाविष्ट केलेल्या आहेत. या काव्य-संग्रहांत बहुश: अक्षर-संख्येचें बंधन पाळलें आहे. निसर्ग-काव्य, प्रेम-काव्य व संकीर्ण अशा तीन गटांत काव्याची विभागणी केलेली आहे.

गेल्या ५-७ वर्षांत निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या कवितांचा समावेश या संग्रहांत करण्यास परवानगी दिल्याबद्दल मी या सर्व संपादकांचा आभारी आहें.

माझे स्नेही श्री. द. बा. जितकर, श्री. व्यंकटेश बुरली तसेंच श्री. सुरेश जगताप आणि चित्रकार श्री. प्रताप मुळीक या सर्वांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. जगताप-कारले प्रकाशन संस्थेचे प्रकाशनाबद्दल व जनसेवा मुद्रणालयाचे उत्कृष्ट छपाईबद्दल मी मन:पूर्वक आभार मानतों.

मकरसंक्रांतीच्या गोड प्रसंगीं सादर केलेला हा 'आस्वाद' रसिकांनीं मधुर मानावा. रसिक वाचकांच्या मनाला एक क्षणभर जरी 'आस्वाद'नें स्वाद दिला तरी माझ्या काव्य-संग्रहाचें सार्थक झालें असें मी समजेन.

मकरसंक्रांत
१४ जानेवारी १९६१.

—राजा यावलीकर
बार्शी.

# अनुक्रम


प्रस्तावना

आस्वाद
जागतो रस्ता
उभा पिंपळ
आभोगी
इशारा
झरा
रेषा
मोहर
कंचुकी
लेणें
यमुनेकाठीं
गुलाबपाणी
विहीर
शेला
नक्षी
सकाळ
भर दुपार
ग्रीष्म
आसरा
उपहास
जिद्द

तिथे तिथे
तुझ्या संसारीं
निंदा

तोरण
मेनका
माझ्या घरांत
स्वारी
मला जिंकलेंस
मला दिसावी
प्रीत रेशमी
येणार तूं
अर्थ जुळावा
गूज उकलतें
नजर खुळी
उशी
निरोप घेतां

शिल्पकार
माझ्या मराठी बोलांत
ज्योत
अजिंठा
व्यथा
जीवन
जखम
भूक
अपेक्षा
थोरवी
चार क्षणिका
मी सिगार पितों


• • •

# प्रस्तावना

"**आस्वाद**" हा श्री. राजा यावलीकर यांच्या निवडक कवितांचा पहिलाच संग्रह. गेल्या दोन-तीन वर्षांत लिहिलेल्या कविता यांत संग्रहित केल्या गेल्या आहेत.

एकाद्या नव्या कवीचा काव्यसंग्रह हातीं घेतल्यानंतर हा कुणाचें अनुकरण करतो आहे किंवा काय असा प्रश्न सहजच मनापुढें उभा राहातो. बऱ्याच कवींच्या जीवनांत असा एक काळ असतोच कीं, जेव्हां आपलें अस्पष्ट भावविश्व प्रकट करण्यासाठीं त्यांना कुणाचा तरी आधार घ्यावा लागतो. आपल्या आवडत्या कवींच्या कविता वाचून त्यांचा मनांत उत्कट प्रतिध्वनि उमटतो आणि त्या प्रतिध्वनीमुळें कांहीं वेळां आपल्याला स्वतंत्र कविता स्फुरली आहे असा भास होतो. आज आपण नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या कविता वाचीत असतांना बऱ्याच वेळां असा अनुभव येतो. त्यामुळें काव्याच्या क्षेत्रांत एक प्रकारचा विलक्षण एकसूरीपणा येत चालल्याची जाणीव रसिक वाचकांच्या मनांत निर्माण होते.

श्री. राजा यावलीकर यांचा काव्यसंग्रह वाचीत असतांना हा विचार माझ्या मनांत सतत जागृत होता; परंतु कळत वा नकळत अशा तऱ्हेचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति त्यांच्या कवितांतून मला फारशी आढळली नाहीं. असें अनुकरण नाहीं म्हणजे ही कविता श्रेष्ठ आहे असें अतिशयोक्त समीकरण मांडण्याची येथें इच्छा नाहीं. तसा अर्थहि कोणी यांतून काढूं नये. साहित्यक्षेत्रांत लहानसें कां होईना, पण स्वतंत्र स्थान प्राप्त होण्यासाठीं लेखकांत लक्षणीय वैशिष्ट्य, पृथगात्मता ही निश्चितपणें असावीच लागते. अशा तऱ्हेची पृथगात्मता श्री. राजा यावलीकर यांच्या कवितेंतून सुस्पष्ट स्वरूपांत अजून व्यक्त झालेली नाहीं; परंतु कोणाचेंहि अनुकरण न करण्याची

त्यांची प्रवृत्ति मला स्वागतार्ह वाटते; कारण आज ना उद्यां यांतूनच त्यांची स्वतंत्र वाट निर्माण होण्याची शक्यता आहे.

दैनंदिन जीवनांत येणाऱ्या साध्या-सोप्या अनुभवांशीं इमान राखून श्री. राजा यावलीकर यांनीं आपली काव्यनिर्मिति केली आहे. ईश्वराचें स्वरूप, सोज्ज्वळ प्रेमभावना, जीवनांतल्या मांगल्याविषयींची ओढ, निसर्गाचें सौंदर्य, सामाजिक विषमता इत्यादि अनुभव त्यांच्या कवितांतून व्यक्त होतांना दिसतात. या अनुभवांचें स्वरूप, हे अनुभव घेण्याची लकब, यांत वाचकांची वृत्ति अंतर्मुख करणारें प्रखर जीवनदर्शन नाहीं; परंतु त्याच-बरोबर नसलेल्या जीवनदर्शनाचें प्रदर्शन करण्याचा लटका हव्यासहि येथें नाहीं. आज कित्येक नव्या कवींत ही गुंतागुंतीच्या भावदर्शनाचे मुखवटे घालून फिरण्याची फॅशन विशेष बळावतांना दिसते. दुर्बोधतेचा इतका सोयिस्कर उपयोग कोणत्याहि काळीं झाला नसेल. श्री. राजा यावलीकर यांच्या कवितांतून व्यक्त होणाऱ्या अनुभवांत थोडा सोपेपणा आहे, सांकेतिकता आहे, परंतु खोटे मुखवटे घालून निर्माण केल्या जाणाऱ्या सखोलतेच्या आणि नाविन्याच्या आभासापेक्षां ही कविता किती तरी पटींनीं सुसह्य वाटते.

चराचरांतून व्यक्त होणारें, नित्य नवीं रूपें धारण करणारें चैतन्य शब्दांत पकडण्याचा श्री. यावलीकर यांनीं "आभोगी" या कवितेंत प्रयत्न केला आहे. ते लिहितात—

गंध तुझा सुमनांत
भास तुझा किरणांत

निर्झर हें तुझें गीत
साक्ष तुझी गिरी देत......

उषा रंगे तुझें स्मित
तुझें तेज बिजलींत......

अशी या चैतन्याच्या नवनवोन्मेषांची त्यांना जाणीव आहे; परंतु या जाणिवेचें स्वरूप कांहींसें बौद्धिक आहे. गंध, उषा, निर्झर आणि किरण यांच्या रूपसौंदर्याचा उत्कट प्रत्यय ही कविता वाचतांना यावा तसा येत नाहीं आणि म्हणूनच अशा कांहीं कवितांना पद्यबद्ध विधानांचें ( Versified Statements ) स्वरूप प्राप्त होतें. याउलट त्यांची " भर दुपार " ही कविता पहा. तींत ईश्वरविषयक अथवा जीवन व्यापून उरणारा चैतन्यविषयक उल्लेख कुठेंहि नाहीं; परंतु दुपारचें सौंदर्य—तो थरथरता क्षण त्यांनीं हलकेच टिपून घेतला आहे आणि म्हणूनच या कवितेंत खऱ्या अर्थानें या नवनवोन्मेषशाली चैतन्याचा सौंदर्यप्रत्यय आपल्या मनाला ही कविता वाचीत असतांना येतो. " भर दुपार " हें चित्र किती तरल आहे पहा:—

भर दुपार वाटेवर–
छायांची जडे नक्षी !
भर दुपार पाण्यावर–
पर्णांची वामकुक्षी !
भर दुपार तरुपर्णीं–
कळिकांची नीज दडे !
भर दुपार मृगजळीं–
ढगांचें स्वप्न बुडे !

कोरल्यासारखी वाटणारी भरदुपारची शांतता या शब्दांतून " प्रत्यक्ष " जाणवते. छायांच्या नक्षींनीं मोहरलेली वाट, पाण्यावर जडावलेल्या पानांची वामकुक्षी, मृगजळांत बुडणारें ढगांचें स्वप्न या सर्व प्रतिमा अनुभवाशीं अगदीं एकरूप झालेल्या आहेत.

निसर्गाचीं अशीं बोलकीं चित्रें रेखाटण्याचें सामर्थ्य हें श्री. राजा यावलीकर यांच्या कवितेंतील एक मनोहर वैशिष्ट्य आहे. विहिरीचें चित्र रेखाटीत असतांना—

रेशमी उन्हाची
करीत सांडणी
पिकल्या पर्णांची
जलांत मांडणी ! ......
शीतल छायेचा
ओढूनी पदर
मिटते पापणी
मध्यान्हीं विहिर !

अशा चित्रमय ओळी ते सहज लिहून जातात; परंतु हाच निसर्ग जेव्हां ते विचार व्यक्त करण्याचें "साधन" म्हणून वापरतात तेव्हां त्यांतलें काव्य ओसरतें, तो निसर्ग कळाहीन होतो. "आभोगी" ही अशा तऱ्हेची कविता आहे. निसर्ग ही कविता केव्हां यशस्वी होते आणि केव्हां फसते हें नीट लक्षांत यावें म्हणून या कवितांची तुलना करून त्यांचें सामर्थ्य आणि मर्यादा दाखवून देण्याचा मीं मुद्दाम येथें प्रयत्न केला.

जीवनाच्या गुंतागुंतीची जाणीवहि श्री. राजा यावलीकर कधीं कधीं व्यक्त करतांना दिसतात. जीवन हें सरळ सोपें नाहीं, परस्पर विरोधी अनुभवांची मोठी विचित्र गुंफण त्यांत झालेली असते, याचें भान त्यांना आहे; परंतु या अनेकरंगी जीवनाचें हें स्वरूप, त्याची गुंतागुंतीची घडण ते ज्या पद्धतीनें व्यक्त करतात ती पद्धत मात्र सोपेपणाच प्रकट करते. या दृष्टीनें त्यांची "जीवन" ही कविता पहाण्यासारखी आहे. जीवनाचें त्यांना जाणवलेलें गुंतागुंतीचें स्वरूप हा या कवितेचा आशय आहे.

कधीं सौख्याचा फुले वसंत
कधीं दुःखाची भयाण रात !
कधीं विलसे हास्य वदनीं
कधीं भरती अश्रू नयनीं !
कधीं विरह कधीं मीलन
नाम गोजिरें अहो, जीवन !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:


या कवितेची घडण तपासून पाहिली असतां आपल्याला काय दिसतें ? सुख-दुःख, विरह-मीलन, प्रकाश-अंधार, हास्य-अश्रु या परस्पर विरोधी जोड्या एका-मागून एक मांडण्यांत आल्या आहेत ! या सर्व जोड्या सांकेतिक आहेत. त्या भाषेंत इतक्या " रुळलेल्या " आहेत कीं, एकादा अनुभव व्यक्त करण्यासाठीं त्या " सुचण्याची " मुळींच आवश्यकता नाहीं. अत्यंत यांत्रिकपणें या सर्व जोड्या सहजपणें डोळ्यांपुढें उभ्या राहातात. मग छंदवृत्तांच्या बेड्या त्यांच्या पायांत ठोकल्या कीं तथाकथित कविता तयार होते ! अशा या अभिव्यक्तीच्या सांकेतिकतेमुळें, काव्यांतून व्यक्त होऊं पाहाणारा अनुभव आपलें वैशिष्ट्य, जीवनदर्शन घडविण्याची आपली क्षमता गमावून बसतो. श्री. राजा यावलीकर यांनीं आपल्या काव्यसाधनेच्या प्रवासांत ही सांकेतिकता टाळण्याचा कसोशीनें प्रयत्न करणें आवश्यक आहे. त्यांच्या चांगल्या उतरलेल्या निसर्ग-कविता वाचीत असतांना त्यांच्या काव्यशक्तीवर आपला विश्वास बसतो आणि म्हणूनच अशी गुळगुळीत सांकेतिकता प्रतिमांचीं हीं झिजलेलीं नाणीं त्यांनीं वापरूं नयेत, ही आपली अपेक्षा विशेषच तीव्र होते.

सामाजिक विषमतेची यावलीकरांना चीड आहे. ही चीड व्यक्त करीत असतांना ते कवितेंतून निबंधवजा गदारोळ भाष्य करीत नाहींत, तर ज्यांत हें दुःख तीव्रतेनें प्रतिबिंबित झालें आहे तो प्रसंग नेमका डोळ्यांपुढें उभा करतात. त्यामुळें अशा कवितांच्या परिणामकारकेंत विशेष भर पडते. या दृष्टीनें त्यांची " भूक " ही कविता पाहाण्यासारखी आहे.

पोर भिकारी उभी सांवळी
पोट पाठीस फाटकी झोळी !
नव्हती आस तिला धनाची
हवी दौलत चतकोरीची !

यांतला " चतकोरीची दौलत " या शब्दांतून व्यक्त होणारा सूक्ष्म उपहास आपलें मन वेधून घेतो. दोन पानी भाष्य करून जो परिणाम

साधणार नाहीं तो या छोट्याशा दोन शब्दांतून नकळत अत्यंत प्रभावीपणें साधला जातो. पुढें ते लिहितात—

साकार झालें दैन्य तिच्यांत
तुकड्यासाठीं घरें धुंडीत !
देतां तुकडा जागे विवेक
हांक नव्हती साक्षात् भूक !

अशा रीतीनें त्या दीन-दुबळ्या भिकारणीच्या मुलीचें चित्र ते डोळ्यांपुढें उभें करतात आणि त्यामुळें समाजांतल्या दुष्ट विषमतेचें स्वरूप उघडें होतें !

श्री. राजा यावलीकर यांनीं प्रेमाच्या विविध छटा रंगविण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु त्यांतली कौटुंबिक प्रीतीची सोज्ज्वळ भावनाच आपलें लक्ष वेधून घेते. पुष्कळ वेळां काव्यापेक्षांहि त्यांत ही सोज्ज्वळता, हा जिव्हाळाच अधिक दिसतो ! या दृष्टीनें त्यांची " तुझ्या संसारीं " ही कविता पाहाण्यासारखी आहे.

दोरीवरती खुले पातळ
आवड तुझी निळी नितळ !
दारावरी रुळे पडदा
कलाकुसर दावी कशिदा !......

आदरातिथ्य भरी गोडवा
तुझ्या संसारीं स्वर्ग पहावा !

अशा या कौटुंबिक चित्रांतून मुग्धपणें डोकावणारी सोज्ज्वळ प्रेमभावना हें श्री. राजा यावलीकर यांच्या प्रेमकवितेचें एक वैशिष्ट्य आहे.

नाहीं माझ्या घरांत
रेडिओचा झंकार
बोबड्या बोलांची
पण वाजते सतार !......

नाहीं माझ्या घरांत
शिरा, बासुंदी, पुरी
मिळे सकलां प्रेमाची
पण भाजी-भाकरी !......

असें समृद्ध कौटुंबिक जीवन त्यांनीं चित्रित केलें आहे.

श्री. यावलीकर यांच्या कवितेचें स्वरूप मंद, शांत आहे. डोळे दिपवून टाकणारा झगमगाट, दिखाऊ बेगडीपणा तींत नाहीं. त्यांच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे—

नाहीं माझ्या घरांत
बिजली ती चमकती
समाधान शांतीच्या
या ज्योति तेवती !

असेंच त्यांच्या कवितेचें स्वरूप आहे.

श्री. राजा यावलीकर यांच्या काव्यसाधनेंत त्यांना उत्तरोत्तर यश मिळो अशीच कुणाहि रसिकाची इच्छा असणार.

—मंगेश पाडगांवकर
मुंबई.

• • •

# आस्वाद

तरल तरंग
लेणीं हीं कोरीव
छेडिला पक्ष्यांनीं
गोडसा भैरव !

पाकळी मोकळी
सुगंधा पेरीते
लकेर दंवाची
पर्णासीं बोलते !

कोवळ्या उन्हाचें
करितां सिंचन
ध्यानस्थ तरु तो
उघडी लोचन !

फुलतो गोपुरीं
भूपाळी–निनाद
मनाचा मयूर
लुटितो आस्वाद !

११८७१

# जागतो रस्ता

शांत झोपला
पाय ताणुनी
बांधी तमाची
मच्छरदाणी !

शीतल वारा
जांभई देतो
गोडशा स्वप्नीं
वृक्ष हंसतो !

बदले कुशी
शांत रजनी
दडे ढगांत
शुक्र लाजुनी !

मुखीं खगांच्या
स्वर फुलतां—
डोळे चोळीत
जागतो रस्ता !

• • •

# उभा पिंपळ

नसे नशीबीं
जन-वर्दळ
दूर एकाकी
उभा पिंपळ !

भग्न विहिर
तळीं कोरडीं
झुरे मनांत
खिन्न टेकडी !

किर्र अंधारीं
कण्हला फाटा
उषा रंगतां
झाला बोभाटा !

विटूनी जगा
पातला जीव
मिरवी फांदी
अभागी शव !

दुःखी स्मृतींत
मना जाळीतो
उभा पिंपळ
पर्णे ढाळीतो !



• • •

# आभोगी

गंध तुझा सुमनांत
भास तुझा किरणांत !

निर्झर हे तुझें गीत
साक्ष तुझी गिरी देत !

जलवृष्टी तुझी माया
निलांबरी तुझी छाया !

उषा रंगे तुझें स्मित
तुझें तेज बिजलींत !

खुले हरी ऋतुरंगी
फुले मनीं हा आभोगी !

**आभोगी :** एका रागाचें नांव.

• • •

## इशारा—

तांबडमाती पेरित हातीं पळते वाट
तुंग तरूंच्या पडछायांनीं भरले घाट !

व्याकुळ वारा शीतलधारा काळा फत्तर
कळ्या सांडती पाकळ्यांतलें गंध-अत्तर !

चंद्र चोरटा हंसतो उलटा पाहुन खालीं
पद्म—कळीच्या पापणींतली नीज जागली !

क्षितीज निर्भर अवखळ निर्झर जल हें पडतें
पानिं तृणाच्या दंव-बिंदूंची नक्षी जडते !

बोट उभारी उंच अंबरीं शिखर हें मौन
शुक्र लाजरा करी इशारा ढगाआडून !

• • •

## मोहर

निशीगंधाची
रीतच न्यारी
सुगंध सारा
सदा वितरी !

गुलाब वेडा
हंसतां गाली
छटा केशरी
पाकळी ल्याली !

हिरवा चाफा
रूप मोहक
सुगंध त्याचा
मत्त मादक

कळी जाईची
शुभ्र हांसरी
अनिल येतां
खुले लाजरी.

तुळस भोळी
फुले समोर
मंगलतेचा–
मौन मोहर !

● ● ●

# कंचुकी

धुसर धरेला
छायेची झालर
वाकड्या वाटेला
तृणाचा मोहर !

काळ्याशा खडका
शेवाळ सारवी
भोवरा भरारा
लाटेला फिरवी !

कलत्या चंद्राचा
सरता आळस
निरखी रूपडें
सोनेरी कळस !

चावऱ्या वाऱ्यानें
राहाटे नारळी
हासली गंधानें
बकुळ डहाळी

विरली खगांची
आगळी गायकी
भिजली उषेची
केशरी कंचुकी !

● ● ●

# लेणें

माळरानाची मला संगत
उभी टेकडी आहे पेंगत !

झाड लिंबाचें करितें छाया
नाहीं लटकी त्याची ती माया !

म्हणे दुरून पाऊलवाट
जीर्ण झोपडी भारी तूं धीट !

वरचें तृण वाऱ्यानें उडे
जीर्ण झालींत सारीं लाकडें !

भयाण रानीं सोशिते त्रास
छाया देण्याची मनींची आस !

चटकें ऊन्ह जेव्हां मध्यान्हीं
विसाव्यास ये भागला कोणी !

निघतां जाया प्रवासी म्हणे—
जीर्ण झोपडी माळाचें लेणें !

• • •

## यमुनेकांठीं—

निळ्या सांवळ्या यमुनेकांठीं—
कदंब-वृक्ष धरीती मौन
कभिन्न काळे कातळ सारे
फेन फुलानें करीती स्नान

तलम साडी हिरवा पोत
बाभुळअंगीं हळद जडे
शुभ्र जलाच्या आरसपानीं
पिंपळ पाही तिचें रूपडें !

उनाड वारा शीळ घालितो
धुंद बासरी आळवी पक्षी
लहरींचें झडतां नर्तन
विरे किनारीं कोरीव नक्षी !

विरही गोपी इथें रंगल्या
इथे फुटले घट राधेचे
पाकळ्यांना सांगत सुटले—
थरथरते बोल दंवांचे !

• • •

# गुलाबपाणी

कुंभ जलाचे
बिजली फोडी
भिजे धरेची
हिरवी साडी

फुटे निर्झरीं
हास्य खट्याळ
कांठ सावरी
तृण–जावळ !

रंग केशरी
वारा उधळी
स्वप्नीं दंवाच्या
रंगे पाकळी !

नभीं मेघांची
कोरिव लेणीं
श्रावण शिंपी
गुलाबपाणी !

# विहीर

रेशमी उन्हाची
करीत सांडणी
पिकल्या पर्णांची
जलांत मांडणी

उठवी तरंग
लाजवी लहर
नक्षी वलयाची
साठवी किनार !

कातळ खडक
झुरतो मनांत
हिरवें शेवाळ
वाहतें निवांत !

शीतल छायेचा
ओढूनी पदर
मिटते पापणी
मध्यान्हीं विहिर

• • •

# शेला

लाडिक सर
झडून गेली
कोवळीं पानें
दंवांत न्हालीं !

खट्याळ वारा
लुटी गारवा
जमल्या नभीं
मेघांच्या नावा !

विणिते जाळें
वीण विजेची
खुले किनार
इंद्रधनूची !

झुले निर्झरीं
लहरी–झुला
धरा धारिते
हिरवा शेला !

• • •

# नक्षी

कुंद आकाशीं
धुंद मेघांनीं
करावी दाटी
मंद वाऱ्याची
शीळ घुमावी
पर्णांच्या ओठीं !

कुंभ जलाचा
वीज फोडितां
उडावे पक्षी
कुरळ्या पानीं
शुभ्र दंवाची
जडावी नक्षी !

• • •

# सकाळ

केशरी उन्हाची
कशिदा काढीत
शीतल वाऱ्याचीं
पैंजणें छेडित !

लाजऱ्या कळ्यांच्या
रंगवी स्मिताला
मंजूळ खगांच्या
आळवी गीताला

हिरव्या पर्णांत
उधळी मौतिक
कुरळ्या लाटांचे
फेनिल कौतुक

दिशांच्या धाग्यांत
प्रकाशाची माळ
बसते गुंफित
हांसरी सकाळ !

• • •

# भरदुपार

भरदुपार वाटेवर
छायांची जडे नक्षी
भरदुपार पाण्यावर
पर्णांची वामकुक्षी !

भरदुपार तरुपर्णीं
कलिकांची नीज दडे
भरदुपार मृगजळीं
ढगांचें स्वप्न बुडे !

भरदुपार निळ्या जळीं
सळसळे मासळी
भरदुपार शुभ्रकळी
लाजते लाजखुळी !

• • •

## ग्रीष्म

विशाल वृक्ष
पर्णांस ढाळी
टिपे पापणी
खिन्न ल्व्हाळी !

खटयाळ वारा
घेतो गिरकी
पायवाटेची
व्यथा निरखी !

तृण पात्यांनीं
टाकिल्या माना
बोलघेवडा
ओढा बोलेना !

झळा झेलितो
डोंगर देहीं
मृगजळांचें
नर्तन पाही !

शोधिती छाया
पक्षी ते वेडे
सोडवी धरा
ग्रीष्माचें कोडें !

• • •

## आसरा

सावरी पदर
कोमल कलिका
हांसला गंधानें
केवडा बोलका !

खुणवी कर्दळी
तांबूस बोटांनीं
नाचली नारळी
पर्णांच्या पैंजणीं !

जाईची जवानी
न्याहळी मोगरा
लाजऱ्या वेलीला
तरुचा आसरा !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39268 विः 3.03
क्रमांक 9520 नोंः दिः 31955

# उपहास

भयाण वादळ
सुटलें मोकाट
काळे काळे मेघ
जमले अफाट !

कडाडतां मेघ
थरारे धरणी
नाचते बिजली
नभाचे अंगणीं !

कोसळल्या सरी
पाणी पाणी सारें
दुथडी भरले
नदीचे किनारे !

कुणा अभाग्याची
झोपडी भकास
चमके बिजली
करी उपहास !

• • •

# जिद्द

जिद्द असे नारळीची
उंच कडा हातीं यावा
हळु हळु लागे करूं
कडाही मनांत हेवा

' वेडी खुळी ही नारळी
तिला काय माझी सर ?
मिरविते शिरीं व्यर्थ
पर्ण-तुरा डौलदार '

कडा कोसळे वादळीं
मारी मिठी आनंदानें
त्याच्यासंगें कोसळतां–
सार्थ केलें तिनें जिणें !

• • •

# तिथे तिथे

तिथे तिथे पलीकडे–
पायवाट पळणारी
दाखवी हरित तृणा
मूर्त तुझी हंसणारी !

तिथे तिथे पलीकडे–
सान झरा झुळझुळे
गौर तुझ्या चरणासी
फेनरूपें घुटमळे !

तिथे तिथे पलीकडे–
सदाफुली हिरमुसे
धवल तुझ्या साडीचा
स्पर्श तिला हवा असे !

तिथे तिथे पलीकडे–
दंवबिंदू ओघळती
बिलोरी नयनांतील
स्वप्न तुझें निरखिती !

तिथे तिथे पलीकडे–
चंद्र खिळे प्राचीवर
विरलेली मीलनाशा
मोहरते क्षणभर !

• • •

## तुझ्या संसारी

दोरी वरतीं
खुले पातळ
आवड तुझी
निळी नितळ !

दारा वरतीं
रुळे पडदा
कला-कुसर
दावी कशिदा !

बैठकींतली
चित्र-संगति
भाव-भक्तीला
आणि भरती

स्वच्छ नेटकी
रांग डब्यांची
फुलें गंधित
साक्ष पूजेची !

आदरातिथ्य
भरी गोडवा
तुझ्या संसारीं
स्वर्ग पहावा !

• • •

# निंदा

म्हणोत ते, सारे जन
आहेस तूं, भारी काळी
पटे परि माझ्या मना
गंधगुणें, खुले कळी !

म्हणोत ते सारे जन
नसे विद्या कांहीं तुला
इवल्याशा घरट्यांत
स्वर्ग दूजा दिसे मला !

म्हणोत ते सारे जन
नसे अंगीं कला कांहीं
घरीं आला पाहुणा तो–
आदरानें धन्य होई !

बोलांनीं अशीच तुझी
करूं देत जन-निंदा
हांसऱ्या मी नयनांत
सांठवितों प्रेम-सुधा

• • •

# तोरण

धवल साडीचा
पदर पोपटी
हरित गोंदणी
रंगे हनुवटी !

विशाल कपोलीं
कुंकुम तिलक
केशरी स्मित तें
अधरीं मोहक !

बिलोरी नयनीं
काजळ कोरीव
गव्हाळीं करी तें
मेंदीचें लाघव !

साक्ष काळी पोत
हिरव्या कंकणा
चिंतितो सौभाग्य
दारींच्या तोरणा !

• • •

# मेनका

सांग कशाला
बाग फुलावा
तुझ्या स्मिताचा
रंग खुलावा !

सांग कशाला
वनीं वसंत
तुझी लाजरी
हंसतां प्रीत !

सांग कशाला
रात चंदेरी
तुझ्या नयनीं
भाव बिलोरी !

हवी कशाला
शुभ्र तारका
तूंच आगळी
माझी मेनका !

• • •

## माझ्या घरांत

नाहीं माझ्या घरांत
रेडिओचे झंकार
बोबड्या बोलांची
पण वाजते सतार !

नाहीं माझ्या घरांत
जाई-जुई फुलली
मातेच्या मुखचंद्राची
नित्यप्रभा खुलली !

नाहीं माझ्या घरांत
शिरा, बासुंदी, पुरी
मिळे सकलां प्रेमाची
पण भाजी-भाकरी !

नाहीं माझ्या घरांत
बिजली ती चमकती
समाधान शांतीच्या
या ज्योति तेवती !

• • •

# स्वारी

लटके खुंटीला
पांढरा सदरा
वावरे घरांत
हांसरा चेहरा !

बिलगे दारासी
वहाण रंगीत
कळाले कानाला
आल्याचें गुपित !

चंचल नयन
शोधिती कुणास
मिळालें हांकेनें
उत्तर प्रश्नास !

कोपऱ्यांत हांसे
बॅग नवी कोरी
घेऊनियां रजा
आली घरा स्वारी !

• • •

## मला जिंकलेंस

नाहीं बोलण्यांत
विजेची चमक
शब्दाला मौनाची
किनार नाजुक !

नाहीं चालण्यांत
चाल ती हंसाची
टाकिसी पाऊलें
धवल यशाचीं !

नाहीं हंसण्यांत
उषेची रंगत
फुलते कलिका
पर्णांच्या जाळींत !

नाहीं सजण्यांत
शृंगार झकास
साध्याच स्वरूपीं
मला जिंकलेंस !

• • •

# मला दिसावी

मेघ सावळे नभीं भरावे
जलधारांनीं तुवां भिजावें
वीज लाजरी जरा लवावी
अशात तूं, मला दिसावी !

मोकाट वारा असा सुटावा
पदर थोडा दूर सरावा
सलज्ज मुद्रा बावरी व्हावी
अशात तूं मला दिसावी !

रात चंदेरी चंद्र फुलावा
भाव गुलाबी गालीं खुलावा
गोड वेदना होतां हळवी
अशात तूं, मला दिसावी !

• • •

# प्रीत रेशमी

तुझ्या चालीनें
हंस लाजतो
तुझ्या वाणींत
पावा घुमतो !

तुझी नजर
भाव फुलवी
तुझे कुंतल
रंभा मिरवी !

तुझ्या स्मितानें
उषा रंगते
तुझ्या गीतानें
वीणा बोलते !

तुझ्या रूपाचें
चित्र रेखतां
प्रीत रेशमी
होते हळवी !

• • •

## येणार तूं

येणार तूं म्हणोनी
चंद्र नभीं हासला
चंदेरी किरणांनीं
भाव तो फुलवीला !

येणार तूं म्हणोनी
नाचे वनीं वसंत
आळविते कोकीळा
तरल तें संगीत !

येणार तूं म्हणोनी
वावरे मंद गंध
डोलती वायुसवें
होऊनी लता धुंद !

येणार तूं म्हणोनी
नजर भिरभिरे
मीलनाचें सौख्य तें
होत आज हांसरें !

• • •

# अर्थ जुळावा

नभीं असावा
चंद्र हासरा
शत धारांची
करीत वृष्टी
लाट लाजरी
शांत किनारीं
जरा बसावी
व्याकुळ कष्टी !

गंध कळ्यांचा
खट्याळ वारा
दशदिशांना
पेरीत यावा
नेत्र-पल्लवी
भाव गुलाबी
शब्दाविण तो
अर्थ जुळावा !

• • •

## गूज उकलतें

डोईचें फूल तुझ्या
वाऱ्याला गंध देत
स्मित तुझ्या गालीचें
मना करी धुंदित !

डोईचें फूल तुझ्या
भूषवि केशभार
रंगतां भाव नेत्रीं
उठे मनीं काहूर !

डोईचें फूल तुझ्या
पाकळ्यांत लाजतें
गुलाबी गुज परि–
ल्जेनें उकलतें !

• • •

# नजर खुळी

असेंच होतें धुंद चांदणें
अशीच होती यमुना काळी
गूज मनींचें जाणुन वेडी
हंसली गालीं, सान डहाळी !

पिकलीं पानें जळीं फेंकुनी
तरंग छेडी शीतल वारा
जवळीं येतां दोघें आपण
ढगांत दडला चंद्र हासरा !

असेंच होतें धुंद चांदणें
तशीच होती यमुना काळी
आठवणीचे भाव दाटतां–
चित्र रंगवी नजर खुळी !

• • •

# उशी

झिरझिरत्या वस्त्रांनीं
शृंगारतां गौर तनू
धुसरशा ढगांतून
तरळे तारका जणूं

लालबुंद टिकलीला
बट कुरळी बोलतां
बावरतो भ्रमर ही–
तुझीच त्यास चारुता !

सैल सैल वेणीवर
गुलाबाचा गंध झडे
निरखितां स्मित तुझें
पाकळीचा रंग उडे !

कर्दळी करांत घुमे
कंकणाचा कलरव
अबोल तूं झंकारतो
टपोर नेत्रीं भैरव !

नखीं नखीं रंगे मेंदी
ठसे तीळ गोऱ्या गालीं
आठवावें कधीं-मधीं
अशी होते उशी ओली !

● ● ●

## निरोप घेतां

बोललीस तूं  अशी एकदां–
सदाफुलीचें  ज्यांत मार्दव !
हासलीस तूं  अशी एकदां–
ज्यांत दंवाची  शुभ्रता नव !

पाहिलेंस तूं  असें एकदां–
कलिका पाही  पर्णाआडुनी
भेटलीस तूं  अशी एकदां–
निरोप घेतां  भिजे पापणी !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११९०७
शाखा

# शिल्पकार

मूर्ति त्यानें पहिली घडिली
भव्य-मंदिरीं जी विराजली !
' कृष्ण-मुरारी ' गर्जती जन
शिल्पकार परि मनीं खिन्न !

दुसरी मूर्ति घडिली ठाम
' धनुर्धारी अयोध्येचा राम ' !
सदैव चाले कथा-कीर्तन
शिल्पकार परि मनीं खिन्न !

मूर्ति तिसरी त्यानें घडिली
' जननी ' त्याची साकार झाली !
झणीं खिन्नता गेली विलया
करूनी पूजन पडे पायां !

• • •

# माझ्या मराठी बोलांत

माझ्या मराठी बोलांत
आगळीच असे भक्ति
हें विश्वची माझें घर
ज्ञानेशाची खुले उक्ति !

माझ्या मराठी बोलांत
विवेकाचा नवा रंग
इंद्रायणीला ही जिंकी
तुकयाचा तो अभंग !

माझ्या मराठी बोलांत
जागे खरा स्वाभिमान
नरसिंह शिवबा तो
बांधी स्वराज्य तोरण !

माझ्या मराठी बोलांत
नाहीं जागा अन्यायाला
न्यायासाठीं प्राणाहुति
हर हर मंत्र हा बोला !

माझ्या मराठी बोलाचे
आज जरी होती हाल
परि उद्यां त्याच्या भालीं
यशाचा टिळा पहाल !

• • •

# ज्योत

सरिता ओढाळ
वाहते झरारा
नाचवी किनारीं
फुलांचा फुलोरा !

जलाच्या दर्पणीं
निरखी कळस
डुलूनी पिंपळ
घालवी आळस !

घंटेचा निनाद
साठवी अंतरीं
ध्यानस्थ टेकडी
वृक्षांच्या झालरी !

वादळी वाऱ्यानें
मांडला आक्रांत
कोसळे कडाडा
नारळी उध्वस्त !

थरारे ज्योत ती
तेवतां तेवतां—
न्याहळी मंदिरीं
मूर्तीची दिव्यता !

• • •

# अजिंठा

अजिंठ्याची रंगरेखा
फुलविते भावमनीं
निरखितां रूपगंध
क्षणांत धुंद पापणी !

भारावतो इथें भाव
प्रेमरंग हरी भान
थबकतां पद तिथें
शब्दाला जडत मौन !

कभिन्न काळ्या पाषाणीं
पद्मपाणी ध्यान शांत
ओसंडे वैराग्य परी
मूर्तींच्या नसानसांत !

रंगली विरहव्यथा
कलास्तंभ विखुरले
विधात्याचें अर्ध-स्वप्न
अजिंठ्यांत बहरलें !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वामित्व

## व्यथा

उंच अशा पतंगास
वाहणारा म्हणे वारा
' धाव तुझी उंच पण
माझ्यामुळें तुझा तोरा ! '

बद्ध परि माझ्या करीं
धाग्यानेंही केलें स्पष्ट
' विसरसी काय वेड्या
होशी क्षणीं स्थान-भ्रष्ट '

' आहे ठावी माझी मला
बंधनाची सारी कथा
ढगासवें निळ्या नभीं
वावरता विरे व्यथा ! '

• • •

## जीवन

कधीं सौख्याचा
फुले वसंत
कधीं दुःखाची
भयाण रात

कधीं यशाची
डुले पताका
कधीं अपेशीं
बुडते नौका !

कधीं विलसे
हास्य वदनीं
कधीं भरती
अश्रू नयनीं !

कधीं विरह
कधीं मीलन
नाम गोजिरें
अहो, जीवन !

• • •

## जखम

इथेंच होता रम्य बंगला
फुलली होती बाग समोरी
डौलदारशा कारंज्यांतून
उडत होतें, जल रुपेरी !

इथेंच होता रम्य बंगला
रुळे पडदा दारावरती
पैंजणाच्या मादक लहरी
वातावरणा धुंद करिती !

इथेंच होता रम्य बंगला
लाख दिव्यांचा लखलखाट
कधीं कथ्थक नि कथकली
नृत्यांतच या, फुले पहाट

इथेंच होता रम्य बंगला
रूप आगळें खिडकी दावी
गर्भ-रेशमी साडी साजुक
कांति नाजुक त्यांतच लपवी !

तोच बंगला त्याच ठिकाणीं
असे उदास, आज एकला
तो खेळ क्षणाचा, सौंदर्याचा
जखम माझ्या, अशी मनाला !

• • •

# भूक

तापला रस्ता देतो चटके
बाराचे होते पडले ठोके !

दिली ढेकर झालों आडवा
तृप्त वाणींत भरे गोडवा !

पोर भिकारी उभी सांवळी
पोट पाठीस, फाटकी झोळी !

नव्हती आस तिला धनाची
हवी दौलत चतकोरीची !

साकार झालें दैन्य तिच्यांत
तुकड्यासाठीं घरें धुंडीत !

देतां तुकडा जागे विवेक
हांक नव्हती, साक्षात भूक !

• • •

## अपेक्षा

देह चिरेबंदी बनला सारा
तळासी हांसतो गाळाचा पसारा !

घडला टाकीनें साज पायऱ्यांचा
स्पर्श नाहीं झाला कधीं पावलांचा

देहाचे दगड नित्य ते हंसती
सातांजन्माची तूं अभागी म्हणती

वर्षतां पर्जन्य अंतर फुलतें
धन तें जलाचें क्षणांत विरतें !

वादळ लहरी अंतरीं घुमती
भरल्या विहिरी धन्य त्या म्हणती !

व्याकुळ प्रवासी आशेनें तो येतो
कोरडी विहीर कशाला म्हणतो ?

वाटतें मनाला नको ही उपेक्षा
पुरवी जलाची एवढी अपेक्षा ! !

• • •

# थोरवी

भव्य मंदिर कळस सोनेरी
महाद्वाराची पहिली पायरी !

आला भाविक करितो वंदन
न्याहळी मूर्ति पायरीवरून !

अंध भिकारी छेडी एकतारी
प्रभू-नामाची देतसे हजेरी !

मंदिरीं येतां भक्तीला भरतें
लाख वहाणा पायरी फुलते !

आल्या-गेल्यांनीं शरीर शिणलें
नित्य सेवेचें अमृत प्राशिलें !

वाटे अंतरीं पायरी बरवी
नको मंदिर—मूर्तिची थोरवी !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39218 वि: 302
क्रमांक 95320 नों: दि: 81616

# चार क्षणिका

## सर्कस

या दुनियेचा तंबू ठोकुन
अखंड सर्कस कोण दावितो
नाकीं घालुन नरास वेसण
रुपया जगीं त्यां नाचवि तो

●

## रामशास्त्री

शत्रुमित्र वा असोत कोणी
न्यायच देणें काम जयाचें
रामशास्त्री, दिसे आजहि–
दर्पण ऐसें नाम तयाचें !

●

## फुलोरा

केशरी साडी कुसुंबी किनार
सावरी पदर संध्या नवथर !
पर्णीं दिसतां, चंद्र हांसरा
रंगे गालीं, लाल–फुलोरा.

●

## जळुनी जगते

उठलीं वलयें गंधित धुंदित
कणकण त्यांचा होतो पुलकित
उदबत्ती ही हसते फुलते
गंधित वलयीं जळुनी जगते !

● ● ●

# मी सिगार पितों

सिगार पितों मी–
सिगार पिणार !
सिगार माझी बोटभर
ओढतों मी दिवसभर
सोडतों धूर वरचेवर
वर्तुळें उठती गोलगोल
देती संदेश बहुमोल
सिगारविणा जिणें फोल
छोटी मूर्ति
अगाध कीर्ति
बेकारीवरतीं
रामबाण असे चारमिनार !

लोक म्हणती सिगार सोडा
चवली छाप विडी ओढा
ते शहाणे मी कां वेडा ?
सिगार ओढतां वाटतें मला
'राजकपूर' साकार झाला
म्हणोत लोक आवारा बनला
सिगारचा बंदा
पिण्याचा धंदा
लोकांची निंदा
वाऱ्यावर नव्हे, धूरावर जाणार !

सिगारनें का दमा होतो ?
दम्याचा तर खिमा होतो
ओढणारा ' किंगकाँग ' बनतो !
छातीचे का खोकें होतें ?
खोक्याचे तर डोकें होतें
डोक्यावरचें टक्कल जातें !
सिगार ठाम
सिगार राम
हरे ऽ ऽ राम
ओढतां ओढतां राम म्हणणार !
सिगार पितों, मी सिगार पिणार !

● ● ●

REFBK-0011971
REFBK-0011971
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
३७२१८
९५२८ / ३१।८।६९